www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १५२ वा रविवार दि. १६ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514



**दैनिक युवक आधार !!**
उरण तालुका : उरण तालुक्यातील दैनिक युवक आधार परिवारातील सौ.तृप्तीताई घनश्याम भोईर यांचे चिरंजीव सत्यम घनश्याम भोईर याने सि.एम.ए या परिक्षेत सुयश प्राप्त केल्या बद्दल दैनिक युवक आधार उरण तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने शुभेच्छा देताना !!

# नळपाणी योजना आली !

## चिरनेर गावातील विहिरी दुर्लक्षित !

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** : चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील विहिरींसह चिरनेर गावात काही खाजगी मालकीलकीच्या विहिरी आहेत. परंतु अलीकडच्या काळात गावोगावी शासकीय नळपाणी योजनेचे पेव फुटले असल्यामुळे, अवघ्या गावाची तहान भागविणाऱ्या विहिरी सद्यस्थितीत दुर्लक्षित झाल्या आहेत. विहिरीतील गाळ काढून विहिरींची निगा राखण्याऐवजी, विहिरींचा उपयोग कचराकुंडी सारखा केला जात असल्याने, चिरनेर गावातील ग्रामपंचायत मालकीच्या सर्वच विहिरींना कचराकुंडीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

विहिरींच्या काठावरील हंड्याची जागा उकिरडे, गवत, झाडे झुडपे व भंगार वस्तूंनी घेतली आहे. यात विशेषताः कातळपाड्यातील मुख्य रस्त्यात असलेल्या विहिरीचा काठ झाडे झुडपे आणि भंगार वस्तूंनी व्यापला असून, विहिरीचा उकिरडा झाला आहे साधारणतः30-32 वर्षांपूर्वी या सर्व विहिरी सुस्थितीत होत्या. चिरनेर गावातील नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी याच विहिरीतील पाण्याचा वापर करत होते या भागातील तळी, नाले, सार्वजनिक पानवठे, कोरडे होत असल्यामुळे, घोटभर पाण्यासाठी महिलांना मैलोमैलची भटकंती करावी लागत असे. चिरनेर- मुळपाडा येथे असलेली रहाट विहीर, पाणीटंचाईच्या काळात जनतेसाठी अमृतकुंभ ठरली होती. पाणीटंचाईच्या वणव्यात शासकीय नळ पाणी योजना महत्त्वाच्या ठरल्या असल्या, तरी येथील वर्षानुवर्षे ग्रामीण भागातील ग्रामस्थांची तहान भागवत असलेल्या, विहिरींकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, या विहिरींची योग्य प्रकारे निगा राखली असती, तर पाणीही स्वच्छ राहिले असते. त्याचा वापर कपडे, धुणीभांडी व इतर कामासाठी करता आला असता असे याच गावात आपल्या ऐन उमेदीच्या काळात याचठिकाणी पाणी भरणाऱ्या धुणीभांडी करणाऱ्या जेष्ठ महिला सांगतात.

चिरनेर गावात जवळजवळ वीस-बावीस वर्षांपूर्वी नळपाणी योजना आली. तेव्हापासून एकेकाळी अमृतकुंभ ठरलेल्या या विहिरींकडे स्थानिक प्रशासनाबरोबर, येथील नागरिकांचे दुर्लक्ष झाले आहे. येथील नागरिक विहिरींच्या पाण्याचा आता कोणत्याही कामासाठी वापर करत नाहीत. आणि आता ते पाणी वापर करण्यायोग्यही राहिलेले नाही. एकेकाळी मार्च, एप्रिल, मे या महिन्यांच्या अखेरीस येथील नागरिकांना पाणीटंचाईची झळ सोसावी लागत होती. एवढी बिकट अवस्था या गावातील पाणीटंचाईची होती विकास आला की पारंपारिक गोष्टि दुर्लक्षित होतात याचा हा उत्तम नमुना आहे.



**अमृतकुंभ ठरलेल्या विहिरींच्या झाल्या कचरा कुंड्यां**

> **गावातील पाणीटंचाईच्या काळात याच विहिरींनी चिरनेर ग्रामस्थांची तहान भागविली होती. . या गावातील जलदायनी ठरलेल्या रहाट विहिरी बरोबर गावातील इतर विहिरींनी देखील एकेकाळी येथील मानवी जीवांबरोबर गुराढोरांची तहान भागविली आहे.मात्र विकासबरोबर पारंपारिक गोष्टी दुर्लक्षित झाल्या त्या विहिरींना आता कचरा कुंड्यांचे स्वरूप आले आहे. पाणी अडवा पाणी जिरवा अशी डरकाळी मारणाऱ्या संबंधित प्रशासनाने या गोष्टीची गंभीर दखल घेऊन, विहिरींच्या काठावर साठविलेलाकेर-कचराझाडे-झुडुपे काढून विहिरींची जागा स्वच्छ करावी. आणि या अमृतकुंभांचे पावित्र्य राखावे**
>
> **नारायण गोंधळी**
> **सामाजिक कार्यकर्ते चिरनेर कातळपाडा**

# शिवजयंतीनिमित्त उलवे नोडमध्ये "महाराष्ट्राची महासंस्कृती"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**-महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्यावतीने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित मराठमोळा कलाविष्कार असलेला "महाराष्ट्राची महासंस्कृती" या दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सेक्टर १२ मधील प्लॉट क्रमांक ६ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल जवळील या मैदानावर सायंकाळी ०६ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा आमदार महेश बालदी, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, समितीचे सरचिटणीस व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

"महाराष्ट्राची महासंस्कृती"मध्ये महाराष्ट्राची लोककला, लोकसंगीत, गणगवळणी, लावणी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्यरचनांचा समावेश असून या कार्यक्रमात विशेषतः "शिवराज्याभिषेक सोहळा" सादर होणार असून या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्यावतीने करण्यात आले आहे.



# रायगड जिल्हा परिषदेच्या लिपिकाकडून सवा कोटीचा घोटाळा

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा**: रायगड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा अलिबाग उपविभागातील वरिष्ठ साहाय्यक लिपीक नाना कोरडे याने १ कोटी १९ लाख रुपयांचा घोटाळा केला. वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांच्या नावावर हे पैसे काढल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा घोटाळा ४ कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. एका साधारण कर्मचाऱ्याच्या खात्यावर सरकारी खात्यातून १० लाखांपेक्षा जास्त रक्कम वळवली गेल्याचे लक्षात आले. तेव्हा हा प्रकार उघड झाला.पंचायतराज सेवार्थ प्रणालीच्या माध्यमातून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात येतो. पगार व कर्मचाऱ्यांना मिळणारे इतर फरक देण्यासाठी दोन स्तर स्थापन करण्यात आले आहेत. याचा गैरफायदा नाना कोरडे याने घेतला. त्याने धनादेशांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या केल्या आणि इतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगाराव्यतिरिक्त अन्यफरकाची रक्कम स्वतःच्या तसेच पत्नीच्या खात्यात वळती करुन घेतली आहे. मार्चअखेर आल्यामुळे जिल्हा परिषदेचे इन्कम टॅक्स कॅल्क्युलेशन सुरु असताना, एका साधारण कर्मचाऱ्याच्या खात्यावर सरकारी खात्यातून दहा लाखांपेक्षा जास्त रक्कम ट्रान्सफर झाल्याचे लक्षात आले वेतनाच्या व्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी रक्कम परस्पर रायगड जिल्हा बँकेतील स्वतःच्या खात्यात कोरडे याने वळती केली. तसेच काही रक्कम पत्नी सोनाली कोरडे हिच्या खात्यात वळती केली. घोटाळा समोर आल्यावर नाना कोरडे याने ६८ लाख रुपये जिल्हा परिषदेला परत केले.नाना कोरडे हा पाणी पुरवठा विभागात कार्यरत होण्याआधी महिला व बालविकास विभागाच्या अलिबाग व म्हसळा प्रकल्प येथे २०२० पासून कार्यरत होता. याठिकाणीही त्याने असाच गैरव्यवहार केला असण्याची शक्यता आहे. याचीदेखील चौकशी नेमण्यात आलेली समिती करत आहे. आपले बिंग फुटले आहे हे लक्षात येताच नाना कोरडे याने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांचे पाय धरले आणि वाचवण्याची विनंती केली.तसेच अफरातफर केल्याचे कबुल करत ६८ लाख रुपये जिल्हा परिषदेला परत केल्याची माहिती बास्टेवाड यांनी दिली आहे. दरम्यान, कोरडे याने केलेल्या घोटाळ्याचा तपास सुरु आहे. तो झाल्यानंतर त्याच्यावर निलंबनाची कारवाई होईलच; परंतू त्यांच्याविरोधत गुन्हा देखील दाखल करण्यात येणार असे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी म्हटले आहे

================




## पत्रकार होण्याची सुवर्णसंधी – दैनिक युवक आधारमध्ये सामील व्हा!

**प्रति,**
**मराठवाड्यातील युवक व इच्छुक पत्रकारगण,**
**सप्रेम नमस्कार!** -आजच्या डिजिटल युगात पत्रकारिता ही केवळ एक नोकरी नसून समाजाच्या आवाजाला बळ देणारे शक्तिशाली माध्यम आहे. जर तुम्हाला आपल्या भागातील समस्यांना वाचा फोडायची असेल, स्थानिक घडामोडींवर लक्ष केंद्रित करायचे असेल आणि प्रभावी लेखनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवायचे असेल, तर दैनिक युवक आधार तुम्हाला एक उत्तम व्यासपीठ प्रदान करत आहे.

**आमच्या दैनिक युवक आधार** – मराठवाडा आवृत्तीमध्ये आम्ही नवोदित आणि तळागाळातील पत्रकारांना संधी देत आहोत. आपण छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि उस्मानाबाद (धाराशिव) या जिल्ह्यांमध्ये पत्रकार म्हणून योगदान देऊ शकता.

**पत्रकार होण्यासाठी आवश्यक पात्रता:**
- तुम्हाला पत्रकारितेची आवड असावी आणि लेखन कौशल्य असणे आवश्यक आहे.
- स्थानिक विषयांवर लक्ष ठेवण्याची क्षमता असावी.
- सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांमध्ये सक्रियता हवी.
- बातमी संकलन व मांडणी करण्याची तयारी असावी.

**अर्ज करण्याची प्रक्रिया:**
इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा, फोटो आणि नमुना लेखन खालील संपर्कावर **पाठवावे** –

**संपर्क:**
**आसाराम विरकर**
**(उपसंपादक, मराठवाडा आवृत्ती)**
9420190212
**श्री. राजू शिंदे**
**(मराठवाडा प्रतिनिधी प्रमुख)**
9403834033
**श्री. जगनाथ रासवे**
**(संपादक, मराठवाडा विभाग)**
9421424564
**मुख्य संपादक:**
**संतोष शिवदास आंबले**
9320083015

युवक पत्रकारांसाठी दैनिक युवक आधार एक मजबूत व्यासपीठ आहे. मराठवाड्यातील युवकांना पत्रकारिता क्षेत्रात संधी मिळावी आणि समाजहिताच्या मुद्द्यांना उजाळा मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.तुमच्यातील पत्रकाराला जाग द्या आणि समाजाच्या हितासाठी आपले लेखणी सामर्थ्य सिद्ध करा!
आपल्या सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा,

**आसाराम विरकर**
**(उपसंपादक, दैनिक युवक आधार – मराठवाडा आवृत्ती)**

मराठवाड्यातील तरुणांसाठी पत्रकार बनण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवक आधार
साठी मराठवाड्यातील सर्व जिल्हा, तालुका व गाव पातळीवर युवा पत्रकारांची निवड
संधी उपलब्ध (जिल्हे )
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बीड, जालना, परभणी हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद (धाराशिव)
पात्रता
- पत्रकारितेची आवड आणि लेखन कौशल्य आवश्यक
- स्थानीय विषयांवर लक्ष ठेवण्याची क्षमता असावी
- सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांमध्ये सक्रियता हवी
- बातमी संकलन व मांडणी करण्याची तयारी असावी
* अर्ज करण्याची प्रक्रिया *
इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा, फोटो आणि नमुना लेखनासह खालील संपर्कावर पाठवावा
संपर्क
आसाराम विरकर (उपसंपादक, मराठवाडा आवृत्ती) मो. ९४२१७९०२८९
श्री. राजू शिंदे मराठवाडा, प्रतिनिधी प्रमुख मो. ९४०३४४९४०३
श्री. जगन्नाथ रासवे संपादक, मराठवाडा विभाग मो. ९४२१६ ४२४६४
मुख्य संपादक संतोष शिवदास आमले मो ९२२०४०३५०९
दैनिक युवक आधार - तरुण पत्रकारांसाठी एक मजबूत व्यासपीठ!



# मुंबई राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित दादा गट) सचिव पदी अजित महामूनकर यांची निवड




**सहसंपादक दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे:**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट ) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजित दादा पवार यांच्या आशीर्वादाने दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष माननीय अजित महामुनकर यांची मुंबई राष्ट्रवादी काँग्रेस सचिव पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट) राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे अध्यक्ष सुनील गिरीजी व अजितदादा पवार त्यांचे उपस्थित हजारो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) प्रवेश केला. अजित महामुनकर त्यांच्या निवडीने मुंबईतील तरुणांना बळकटी मिळेल. कारण अजित महामुनकर हे दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या मागे हजारो कलाकारांची पडद्यामागील कलाकार व इतर सिनेमा इंडस्ट्रीतील लाखोच्या संख्येने त्यांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मजबुती मिळेल.

## भारज बुद्रुक येथे संत शिरोमणी रविदास महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे/वरूड सर्कल, जाफ्राबाद**-जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे चर्मकार समाज बांधवांच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संत शिरोमणी रविदास महाराज यांची शोभयात्रा काढण्यात आली असून वेसला प्रदक्षिणा घालन्यात आली यावेळी उपस्थित माजी सरपंच तुळशीराम पायघन, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरद तेलंग्रे , सामाजिक कार्यकर्ते उमेश भैया रहेकवार, पोलिस पाटील संजय तेलंग्रे, रफिक टेलर, रोजगार सेवक एम डी गायकवाड , तंटामुक्ती अध्यक्ष विलास गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य सदाशिव खरात,अनिल नरवाडे, सीताराम वाध, शुभम चोरमले, रोहिदास खंसरे, चंपालाल खंसरे, विष्णू खंसरे,विजय खंसरे,विनोद खंसरे, आदी गांवकरी मंडळी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## टाटा व ग्रामपंचायत दूंदरे कडून विद्यार्थ्यांना स्किल डेव्हलपमेंट मार्गदर्शन शिबिर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी:**ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे व व टाटा स्ट्राइव स्किल डेव्हलपमेंट सेंटर यांच्यावतीने भैरवदेव विद्यालय रिटघर येथे शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिर पार या वेळी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना भविष्यात रोजगारासाठी रोजगार विमुख मोफत प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र व नोकरीसाठी मदत देखील करणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी टाटा स्ट्राइव स्किल डेव्हलपमेंट सेंटर अधिकारी व सरपंच सुभाष शेठ भोपी माजी उपसरपंच जयदास चौधरी ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील मुख्याध्यापक साळुंखे सर सदस्य शांताराम चौधरी पोलीस पाटील रिटघर दीपक पाटील माझी सदस्य दिलीप उलवेकर माजी सरपंच उमरोली नितीन काठवले आदी मान्यवर उपस्थित होते




## शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवून घेण्याचे सोदक यांचे आवाहन

**दै. युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी**
**जनार्दन चव्हाण/विंचूर** - कृषी क्षेत्रात डिजिटल सेवेचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने आणि परिणामकारकरीत्या लाभ घेणे सोप्या पद्धतीने होण्यासाठी केंद्र शासनामार्फत ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी नोंदणी करून लाभ घ्यावा,असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपतालुका प्रमुख बापूसाहेब सोदक यांनी केले आहे. पीएम किसान सन्मान योजना, पीक विमा योजना, तसेच पीक कर्ज, नुकसान भरपाई, अनुदान, हवामान डेटा, मृदा आरोग्य माहिती, वेगवेगळ्या पिकांबद्दल सल्ला यांसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ या फार्मर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या महा ई-सेवा केंद्र, सीएससी सेंटर येथे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहनही सोदक यांनी केले आहे. फार्मर आयडी तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना आधारकार्ड आणि आधारकार्डाशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.



## सुभाषनगरच्या सरपंचपदी छायाताई लांडबले

**दै. युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी/जनार्दन चव्हाण/विंचूर** - येथून जवळ असलेल्या सुभाषनगर गावामधे सरपंच निवडीची प्रक्रिया पार पडली यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी तसेच कोणतीही निवडूनक न घेता बिनविरोध सरपंच करावा असे ठरविण्यात आले त्या अनुशंघाने छाया पुंजाराम लांडबले यांची सुभाषनगर ग्रामपंचायत सरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. महिलेला सरपंच पदाचा मान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी गावातील नागरिक उपस्थित होते.शिवसेना जिल्हाप्रमुख उबाठा शिवसेना कुणाल भाऊ दराडे, धनगर समाज नेते शिवाजीराव ढेपले,जिल्हाप्रमुख प्रमुख शिंदे शिवसेना भाऊलाल तांबडे,पं. स.सभापती निफाड शिवाजी सुपनर, तालुकाप्रमुख शिवा शुराशे,उपतालुका प्रमुख बापूसाहेब सोदक,शहर प्रमुख नानासाहेब जेऊघाले यांनी निवडीचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.



## बोगस चलन, वारस दाखला प्रकरणात 7 जणांना अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : बोगस वारस दाखला आणि बोगस चलन प्रकरणात पनवेल शहर पोलिसांनी एकूण सात जणांना अटक केली आहे. दीपक फड, ॲड योगेश केळकर, एड अमर पटवर्धन, गौरी केळकर, ॲड संकेत पाटील, प्रवीण बांदिवडेकर, ॲड विशाल मुंडकर अशी त्यांची नावे आहेत. एकापाठोपाठ एक वकिलांना अटक होत असल्याने वकिलांच्या छातीत धडधड वाढू लागली आहे. पनवेलमध्ये गाजत असलेल्या बोगस वारस दाखल्यांच्या प्रकरणांकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. बोगस चलना प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात एकूण 3 गुन्हे दाखल आहेत. पनवेलमधील बोगस दाखला प्रकरण राज्यभर गाजत असून या प्रकरणाला दिवसेंदिवस वेगळे वळण लागू लागले आहे. आरोपी दीपक फड, योगेश केळकर, अमर पटवर्धन यांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे. यातील आरोपी गौरी केळकर ह्या आधारवाडी तुरुंगात आहेत. यातील विशाल मुंडकर प्रवीण बांदिवडेकर, संकेत पाटील हे पोलीस कोठडीत आहेत. मागील आठवड्यात आरोपी विशाल मुंडकर यांच्या कार्यालयाच्या पंचनाम्यासाठी पोलीस गेले असता झाडाझडतीमध्ये बोगस चलन सापडले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर तळोजा कारागृहातून संकेत पाटील याला शहर पोलिसांनी पुन्हा ताब्यात घेतले असून त्याला न्यायालयाने 17 फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विशेष तपास पथकाचे पोलीस निरीक्षक सचिन परदेशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ, बजरंग राजपूत, हे याप्रकरणी तपास करत असून नियंत्रण आणि मार्गदर्शन पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त आणि वपोनी पनवेल करत आहेत. या प्रकरणात आणखी कोणा कोणाचा हात आहे याचा तपास पोलिसांनी सुरू केलेला असून या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे.

## पदवीच्या ज्ञानाचा वापर समाजहितासाठी करा - सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे आवाहन स्वयंशिस्त आणि कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/अमरावती प्रतिनिधी/ नागपूर, दि. १५** - जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम आणि स्वयंशिस्त असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पदवीच्या ज्ञानाचा वापर हा समाज हितासाठी करण्याचे आवाहन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज येथे केले.

वर्धा रोडवरील वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ आज आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा विधी विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमूर्ती अनिल किलोर,
सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, कुलगुरु प्रा. डॉ. विजेंदर कुमार, महाराष्ट्राचे महाधिवक्ता बीरेंद्र सराफ, विधी विद्यापीठाचे कुलसचिव विवेक गव्हाणे यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.

विधी कारकीर्दीत सखोल अभ्यास तसेच कायद्याची समज आवश्यक असते. विधी विद्यापीठातून कायद्याची अक्षर ओळख करून घेण्यासोबतच कायद्यामागची भूमिका , इतिहास , कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणे आवश्यक




असते. तुमच्या कामामुळे लोकांचे जीवनमान तसेच स्वातंत्र्यावर परिणाम होतो. त्यामुळे विधी कारकीर्द हे महत्त्वपूर्ण असे क्षेत्र ठरते. आयुष्यात स्वयंशिस्त आणि कठोर परिश्रम जोपासत कुमार यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक कामगिरीचा आणि उपक्रमांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. या दीक्षांत समारंभाला विधी क्षेत्रातील मान्यवरांची तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांची

## महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ उत्साहात

आपल्या पदवीच्या ज्ञानाचा वापर हा समाज हितासाठी करण्याचे आवाहन सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी केले.

विधी विद्यापीठातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कारकीर्दीचे विस्तीर्ण असे क्षेत्र खुले आहे. कायद्याच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यासाठी आता विविध शाखा उपलब्ध झाल्या आहेत. ज्ञानार्जनासाठी अनेक संधी आज उपलब्ध झाल्याचे प्रतिपादन विधी विद्यापीठाचे कुलपती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दीक्षांत समारंभाप्रसंगी केले .तत्पूर्वी, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ . विजेंदर उपस्थिती होती .

**आदिती बैसला सर्वाधिक सात सुवर्णपदके**- पदवीप्रदान समारंभात एकूण १५५ पदवी प्रदान करण्यात आल्या . ज्यामध्ये ११२ पदवी, २८ पदव्युत्तर आणि १५ पीएच.डी. पदव्या समाविष्ट होत्या. सर्वाधिक सात सुवर्णपदके विद्यार्थिनी अदिती बैस यांना मिळाली. उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी विद्यापीठाचे सुवर्णपदक विद्यार्थी विश्वजीत राव आणि विद्यार्थिनी आकांक्षा बोहरा यांना सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# मधमाश्या चावल्याने एका ट्रेकरचा मुत्यू ; ५ जण जखमी

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर:** ट्रेकिंगसाठी कर्नाळा किल्यावर पर्यटनासाठी आलेल्या एका व्यक्तीला मधमाश्या चहवल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी घडली संदीप गोपाळ पुरोहित ( वय ४४ रा. कोपरखैरणे) असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. कर्नाळा किल्ल्यावर आलेय पर्यटकांवर मधमाशांनी केलेल्या हल्यामुळे त्यांची धावपळ उडाली यामध्ये संदीप यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलीसांनी सांगितले. मधमाशांच्या हल्यात अजून पाचजण जखमी असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे.

सुट्टी असल्याने शेकडो पर्यटक कर्नाळा किल्यावर आले होते. यामध्ये मुंबई येथील व्हीजेटीआय महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचा मोठा समुह होता. त्याचसोबत काही पालक आपल्या मुलांना कर्नाळा किल्यावर पर्यटनासाठी घेऊन आले होते. ४० ते ५० पर्यटकांचा गोंधळ झाल्यामुळे मधमाशा भडकल्याने त्यांनी अनेकांना दंश केले. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांना मिळताच त्यांनी तातडीने पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोने यांच्यासह पोलीस पथक रवाना केले. या दरम्यान जखमींनी रुग्णवाहिकेसाठी १०८ वर संपर्क साधल्याने जखमींना वेळीच मदत मिळाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगीतले. जखमींना पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. पर्यटकांमध्ये जी धावपळ उडाली त्यापैकी एक संदीप पुरोहित हे आहेत. ४४ वर्षीय संदीप हे नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे रहिवासी होते. शनिवारी ते कुटुंबासोबत कर्नाळा किल्ल्यावर पर्यटनासाठी आले होते. यावेळी संदीप यांच्या डोळ्याला मधमाशांनी दंश केल्यानंतर सैरावैरा हे धावू लागले आणि याच गोंधळात खाली पडल्यामुळे त्यांचा डोक्याला दगड आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा उपचार मिळण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती रुग्णालयातील डॉक्टरांनी दिली.




## श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीवर गोविंद पुरमध्ये पारंपरिक नृत्याची रंगत



**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर:** घाटंजी तालुक्यातील गोविंदपुर येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.गावकऱ्यांनी सेवालाल महाराज यांच्या भक्ती मध्ये पारंपारिक नृत्य करीत गोविंदपुर गावाची शोभा वाढवली.. व तसेच बाईक रॅली काढण्यात आली
क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची शिकवण
१) जंगल आणि पर्यावरणाचे रक्षण करा.
२) कोणालाही किंवा कोणत्याही प्रकारात भेदभाव करू नका.
३) सन्मानाने आयुष्य जगा.
४) इतरांशी वाईट बोलू नका आणि इतरांना इजा करु नका.
५) स्त्रियांचा सन्मान करा, आणि मुली जिवंत देवी आहेत.
६) काळजी करू नका आणि संकटाला निर्भयपणे तोंड दया, धैर्यवान आणि आत्मविश्वासू जीवन जगा.
७) पाण्याचे रक्षण करा आणि तहानलेल्यांना पाणीपुरवठा करा आणि कधीही पाणी विकण्यास गुंतवू नका जे सर्वात मोठे गुन्हा / पाप आहे.
८) वडीलधारी माणसांचा आदर करा आणि तरुणांवर प्रेम करा आणि प्राण्यांचा देखील आदर करा.
९) जंगलाला कधीही सोडू नका आणि जंगल नष्ट करू नका, जर आपण जंगल नष्ट केले तर आपण स्वतःला नष्ट करीत आहात.
१०) मनन केल्याने आंतरिक शांती मिळेल, आणि अभ्यास करा, ज्ञान मिळवा आणि ज्ञान इतरांना वाटा.
११) माणुसकीवर प्रेम करा.
१२) आयुष्यावर तर्क करा आणि सर्व अंधश्रद्धायुक्त विश्वास टाळा.
१३) कुटूंबाची आणि समाजाची काळजी घ्या आणि समाजातील बंधुता कधीही भंग करु नका
१४) धैर्य मानवतेच्या शिस्त, चिंतनशील आणि एक बुद्धीप्रामाण्यवादी संत होते.अंधकारात सापडलेल्या भक्तांना त्यातून मार्ग काढण्यासाठी सदोदित मार्गदाता म्हणून आजीवन भूमिका केली.

## महावाचन उत्सवात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या गार्गी महाडिक रायगड जिल्ह्यात प्रथम



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : महावाचन उत्सव उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकुर पब्लिक स्कूलमधील इयत्ता चौथीतील गार्गी महाडीक हिने उत्कृष्ट वाचन कौशल्याचे प्रदर्शन करत प्राथमिक गटातून रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम तीन गटात राबविण्यात आला. महावाचन उत्सव उपक्रम अंतर्गत आयोजित केलेल्या गट अ इयत्ता तिसरी ते पाचवी गटातील स्पर्धेत गार्गी महाडीक हिने रायगड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत प्रथम आलेल्या गार्गी महाडीक हिला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने गौरविण्यात आले. या अभूतपूर्व यशाने गार्गीने सगळ्यांची मने जिंकली आहेत. तिच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी आणि शिक्षकवृंद यांनी गार्गीच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करत तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# जर्नी From सिग्नेचर टु आटोग्राफ "प्रेरणादायी व्याख्यान संपन्न "

**दैनिक युवक आधार सहसंपादक मुकुंद कांबळे/पनवेलः(प्रतिनिधी)**"प्रेक्षकात बसून दुसऱ्यासाठी टाळ्या वाजविण्यापेक्षा स्वतः मान्यवर होऊन दुसऱ्यांना टाळ्या वाजविण्यास उद्युक्त करा." असा उपदेश नामवंत लेखक,व्यवसाय प्रशिक्षक डॉ. रत्नाकर अहिरे यांनी केला.येथील चांगु काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था आणि चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज, नवीन पनवेल ( स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच आयोजित केलेल्या' "जर्नी From सिग्नेचर टू ऑटोग्राफ'"या कार्यक्रमांतर्गत प्रेरणादायी व्याख्यानाच्या वेळी ते बोलत होते. वीरस्वामी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था आणि लिटल किड्स आयडीयल स्कूल, नवीन पनवेल हे कार्यक्रमाचे सह आयोजक होते .तर कार्यक्रमाची संकल्पना एन.डी. खान यांची होती.



डॉ रत्नाकर अहिरे पुढे म्हणाले,"पुस्तक, चित्रपट, चारचौघात आपला झालेला अपमान,प्रेरणादायी भाषण यामुळे आपले आयुष्य बदलू शकते. त्यातील सकारात्मक बदलामुळे आपल्या आयुष्याला निराळी दिशा मिळते. अपेक्षित उंची गाठण्यासाठी पाया देखील तेवढाच मजबूत पाहिजे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर केवळ डोळेच नव्हे तर पाची इंद्रिये खुली ठेवली पाहिजेत. माणसाने रुचेल व पचेल तेवढेच खावे.मानपान, अहंकार तसेच क्षुल्लक गोष्टींचा बाऊ करू नका. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर जी गोष्ट आयुष्यात पूर्वी कधीच केली नसेल ती केली पाहिजे. जीवनात नेहमी नावीण्य पाहिजे. घर ते कार्यालय एकाच रस्त्याने जाण्यापेक्षा अधून मधून वेगळ्या रस्त्याने जा.जीवनात काहीतरी वेगळे करा.आतली मनस्थिती आपण चांगली ठेवली तर बाहेरची कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी ती अनुकूल होऊ शकते.'माता आणि माती'याकडे लक्ष ठेवा.इथे फक्त वेलांटीचा फरक आहे. कोणतीही कलाकृती प्रथम कलाकाराच्या कल्पनेत व नंतर प्रत्यक्षात साकार होते. आपल्या निरर्थक आयुष्याला आपल्या कर्तृत्वाने अर्थ प्राप्त होतो. जी माणसं मनापासून ऐकतात त्यांचे प्रश्न लवकर सुटतात. आपले म्हणणे अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांनी गरुडासारख्या पक्ष्यांच्या,हत्ती- सिंहासारख्या प्राण्यांच्या गोष्टींचा, विविध आठवणी,किस्से यांचा सढळपणे उपयोग केला. आपल्या वापराल्या अनेक वस्तूंचा उपयोग करून त्यांनी आपले म्हणणे पटवून दिले. प्रसंगी त्यांनी मुकाअभिनयाचा प्रभावी वापर केला. सुमारे दोन- अडीच तास प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन त्यांचे भाषण ऐकत होते. कॉलेजचे सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते. टाळ्यांच्या कडकडाटामधून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत होता. कार्यक्रमापूर्वी सौ. सुरेखा भुजबळ यांच्या 'सूर संध्या संगीत अकॅडमी' मधील बालचमूंनी विविध समर्पक गीतांचे सुरेल सादरीकरण केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. संस्थेचे संस्थापक व कार्यक्रमाचे संयोजक एन.डी.खान यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रुपा भामरे यांनी नेहमीच्या सफाईने केले..संघटक वीरस्वामी शैक्षणिक आणि सामाजिक विकास संस्थेचे संजय हिरेमठ होते.तर समन्वयक लिटल आयडियल किड्स स्कूलच्या प्राचार्या सौ.पूनम गुप्ता व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या कार्यकारी सभासद सौ.सलमा खान होत्या. कार्यक्रम स्थळी सुधाकर पाटील निवृत्त सहकारी अधिकारी, एकनाथ खुल्लम निवृत्त पोलीस अधिकारी, कॅप्टन मनोज भामरे, पत्रकार मिलिंद पाटील, मंगला बिराजदार ,सेजल जाधव,अनिल बिराजदार,पूजा मंडोरा, भाग्यश्री भुजबळ, सलीम मुनवर,केशव कांबळे ब्रेन डेव्हलपमेंट अकॅडमी चे विभांडीक सर व इतर अनेक प्रतिष्ठित उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार ताकमोगे.सौ.मीना ताकमोगे,सौ.शीतल भामरा,सौ. मृणाल पवार.सौ.सुजाता चोरगे,सौ. क्षमा तिवारी यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनानंतर या स्फूर्तीदायक कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हा परिषद शाळा मुलेखंड येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड** : जिल्हा क्षयरोग कार्यालय अलिबाग रायगड, तालुका आरोग्य अधिकारी उरण आणि ओएनजीसी कंपनी उरण प्लांट यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी रा.जि.प.शाळा मुळेखंड या शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व क्षयरोग जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. अंगणवाडी ते शाळेतील इयत्ता सातवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा, आरोग्य तपासणी तसेच क्षयरोग जनजागृती कार्यक्रम संपन्न घेतला . या शिबिरासाठी जिल्हा क्षयरोग आरोग्य अधिकारी डॉक्टर दात्रांव सर तालुका आरोग्य अधिकारी कक्ष.जाधव सर तसेच ओएनजीसी प्लांट मॅनेजर मा. बिक्रम सिंग साहेब, हेड फायनान्स मा. मेहता सर, हेड एच आर मा.भावना आठवले मॅडम, मेडिकल ऑफिसर इनचार्ज डॉक्टर जीवन वाघमारे सर, डॉक्टर रवींद्र त्रिपाठी सर, डॉक्टर रितू खेमानी मॅडम, डॉक्टर ऋत्विक कुलकर्णी सर, डॉक्टर रेवती मॅडम, नेत्र चिकित्सक डॉक्टर पी.एम गर्ग सर डॉक्टर मेरी जान मॅडम, आरोग्य सेविका मोनाली पाटणकर मॅडम, मारिया मॅडम,प्रकाश सर, सादीक खान सर, गौरव सर अभिषेक सर इतर या टीमने सर्व विद्यार्थ्यांची यशस्वीपणे तपासणी करून शेवटी ओएनजीसीच्या मार्फत पूरक आहार व आरोग्य किट तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर यांनी सर्व उपस्थितांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सन्माननीय अध्यक्षा मनीषा म्हात्रे मॅडम व सर्व सदस्य तसेच चार अंगणवाडी सेविका सर्व शिक्षक वृंद विद्या वाणी, दिशा तांडेल, संजय होळकर सर, अर्चना पाटील, सुजाता होळकर मॅडम, मिलिंद म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेऊन हे शिबिर यशस्वी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेचे उपक्रमशिल शिक्षक संजय होळकर सर यांनी मानले.






# देहरंग धरण उंची वाढवण्याच्या नियोजित प्रकल्पाला आर्थिक पाठबळ द्या- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार पनवेल (प्रतिनिधी)** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या गाढी नदीवरील देहरंग धरणाची उंची वाढविण्याच्या नियोजित प्रकल्पास आर्थिक पाठबळ देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महानगरपालिकेची स्थापना ०१ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली असून, मुंबई, नवी मुंबई शहरालगत असल्यामुळे तसेच विमानतळ व परिसरातील औद्योगिकरण यामुळे महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. महानगरपालिका क्षेत्राची प्रती माणसी १५० लीटर या मापकाप्रमाणे दैनंदिन स्थुल गरज ३९४ दश लक्ष लिटर असून २०५७ पर्यंत ८४७ दश लक्ष लिटर असणार आहे. सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रास देहरंग धरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको, नवी मुंबई महानगरपालिका (मोर्बे धरण) व एमआयडीसी यांच्याकडून सुमारे २२४ दश लक्ष लिटर पाणी पुरवठा होतो. तथापि वाढती लोकसंख्या विचारात घेता भविष्यात त्यामध्ये फार मोठी तुट येण्याची शक्यता आहे. ही तुट भरून काढण्यासाठी दुर्देवाने पनवेल महापालिकेकडे स्वतःच्या मालकीच्या देहरंग धरणाची उंची वाढवण्याच्या पर्यायाशिवाय अन्य पर्याय दृष्टीपथात नाही, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या निवेदनात अधोरेखित केले.



महानगरपालिकेच्या मालकीच्या देहरंग धरणाची पूर्ण संचय पातळी वाढविल्याने पाणी संचयात मोठी वाढ होऊन त्याच्या वापर सुलभरीत्या व कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून होणार आहे. देहरंग धरणाची उंची वाढविणे संदर्भात व त्यासाठी करावयाच्या आर्थिक तरतुदीसंदर्भात आयुक्त-पनवेल महानगरपालिकेने आपल्याकडे ०९ जानेवारी २०२५ रोजी एक प्रस्तावही सादर केला आहे. त्या अनुषंगाने देहरंग धरणाची पूर्ण संचय पातळी २० मीटरने वाढविणे व त्यासाठी २९४ हेक्टर जमीन संपादन करण्यासाठी सुमारे ९०० कोटी रूपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र नव्याने स्थापन झालेल्या महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राज्य सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

=================

# दासनवमी उत्सवात हेमंत देशमुख यांचे गायन




**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**:येथील श्री रामदास (मारुती) मंदिरात १०८ व्या दासनवमी उत्सवाला प्रारंभ झाला. या उत्सवाच्या दुसऱ्या सत्रामधे रत्नागिरी येथील हेमंत देशमुख यांचे गायन संपन्न झाले. 'गणपती गणराज' या पदाने त्यानी गायनाला प्रारंभ केला. त्यानंतर मंदारमाला नाटकातील 'जय शंकरा' हे नाट्यगीत सादर करून रामाचे भजन' हा अभंग सादर केला. नंतर चंदनाचे परिमल, कोटी कोटी रुपे तुझी, स्वकर शपथ, वाजे वृंदावनी वेणू असे अभंग, भक्तिगीते व नाट्यगीते त्यानी सादर केली. नंतर 'श्रीरंगा कमलाकांता' हे नाट्यपद गावून 'रघुकुलक दीपक आले' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.

नंदकुमार कर्वे यांनी संवादिनी, गणेश घाणेकर यांनी तबला व निनाद कर्वे यांने तालवाद्यसाथ केली. वर्षा रानडे-सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या ओघवत्या वाणीने निवेदन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

# साकोळ मध्ये विविध ठिकाणी अवैधदेशी दारू विक्रीत्यावर धाडी १० हजाराचा माल जप्त

## बिट आमलदार बदलताच धाडीचे सत्र सुरू अवैध धंदेवाल्याचे धाबे दणानले

**दैनिक युवक आधार प्रशांत तांबोळकर/शिरूर अनंतपाळ/लातूर**: तालुक्यातील साकोळ गावात अवैध देशी दारूची विक्री आनेक दिवसा पासून सुरू होती .पण जानेवारी महिन्यात पोलीस उपविभागीय अधिकारी साह्यक पोलीस अधिक्षक बी चंद्रकात रेड्डी यांच्या आदेशानुसार एक वर्ष ज्या बिट मध्ये पोहेका ने काम केले आहे त्यांच्या बदल्या करा असा आदेश मिळाल्यामुळे ठाण्याचे पोलीस निरीक्षक विठ्ठलराव दराडे यांनी. साकोळ बिटला पोहेका गोविंद मलवाडे यांनी पदभार घेताच अवैध देशी दारू व शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा चोरीच्या मार्गाने विक्री करणाऱ्या वर अंकूश ठेवण्यासाठी. पोहेका गोविंद मलवाडे यांनी आपल्या सहकार्यांना सोबत घेऊन एकाच वेळी दि १४ फेब्रुवारी रोजी विविध ठिकाणी धाडी टाकून जवळ पास ९३१० रुपयेचा मुद्दे माल जप्त करून आरोपी च्या विरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

शिरूर अनंतपाळ पोलीस सुत्राकडून दिलेल्या माहिती वरून साकोळ येथील आरोपी मल्लीकार्जुन परमेश्वर स्वामी यांनी साकोळ येथील त्याच्या स्वताच्या राहत्या घरासमोर विना पास परवाना बेकायदेशीरीत्या देशी दारूचा चोरटी विक्री व्यावसाय करण्याच्या उददेशाने देशी दारू असली धार संत्रा कंपणीच्या कागदी लेबल असलेल्या काचेच्या सिलबंद १८०मि.लीच्या ९६ बाटल्या प्रती किं.अं ७० रू. प्रमाणे किं.६७२० रू.प्रो. गुन्हयाचा माल स्वताचे कब्जात बाळगुन तिची चोरटी विक्री व्यवसाय करीत असताना मिळुन आला त्या संदर्भात पोहेका सचिन चामे यांच्या फिर्यादीवरून शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

दि १४ फेब्रवारी रोजी साकोळ गावात दुसरी कार्यवाही करून आरोपी प्रविण संभाजी सुर्यवंशी रा . साकोळ ता. शिरुर अनंतपाळ या आरोपीने साकोळ येथील त्याच्या स्वताच्या घरासमोर विना पास परवाना बेकायदेशीररीत्या देशी दारूचा चोरटी विक्री व्यावसाय करण्याच्या उददेशाने देशी दारू असली धार संत्रा कंपणीच्या कागदी लेबल असलेल्या काचेच्या सिलबंद १८० मि.लीच्या २३ बाटल्या प्रती किं. ७० रू. प्रमाणे किं. १६१०-रूपेचा माल स्वताचे कब्जात बाळगुन तिची चोरटी विक्री व्यवसाय करीत असताना मिळुन आला. फिर्यादी गजानन अन्सापूरे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला .

**दि १४ फेब्रुवारी रोजी आरोपी लक्ष्मण त्र्यंबक मादळे**


तिपराळ ते साकोळ जाणा-या रोडलगत त्याचे मौजे साकोळ येथील स्वताचे किराणा दुकानाच्या समोर विना पास परवाना बेकायदेशीरीत्या देशी दारूचा चोरटी विक्री व्यवसाय करण्याच्या उददेशाने देशी दारू असली धार संत्रा कंपणीच्या कागदी लेबल असलेल्या काचेच्या सिलबंद १८० मि.लीच्या १४ बाटल्या प्रती किं. ७० रू.प्रमाणे किं. ९८० रू. गुन्हाचा माल स्वताच्या कब्जात बाळगुन तिची चोरटी विक्री व्यवसाय करीत असताना मिळुन आला. फिर्यादी पोहेका कैलास तुकाराम शिंदे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला .

वरील तिन्ही आरोपीच्या विरुद्धात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात प्रो गुरन - ३५ ,३६ ,३७ /२५ क ६५ (अ) (इ) मुंबई दारु बंदी कायदा व साकोळ च्या तिन्ही आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे . ही कार्यवाही पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शना खाली करून पुढील तपास पोहेका गोविद मलवाडे करीत आहेत .

=======================

# कुणबी समाज ऐनघर विभाग अध्यक्ष यशवंत हळदे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : महेंद्र माने**-रोहा तालुक्यातील नागोठणे विभागातील तामसोली गावाचे रहिवासी तसेच ऐनघरचे माजी उपसरपंच तथा कुणबी समाज ऐनघर विभाग अध्यक्ष यशवंत नारायण हळदे यांचे वयाच्या 58 व्या वर्षी गुरुवार 13 फेब्रुवारी रोजी सकाळी आकस्मित निधन झाले. अतिशय प्रेमळ व मन मिळावू स्वभावाचे तसेच प्रशासकीय कामाचा दांडगा अभ्यास असलेले यशवंत हळदे यांच्या पार्थिवावर रात्री तामसोली येथील स्मशानभुमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात योगिनी हळदे या पत्नी,धिरज हळदे हा मुलगा,स्मिता काटकर,सायली हळदे व स्नेहल हळदे या तीन मुली तसेच जावई असा परिवार असून त्याचे दशक्रिया विधी शनिवार 22 फेब्रुवारी तर उत्तरकार्य मंगळवार 25 फेब्रुवारी रोजी राहत्या घरी तामसोली येथे होणार असल्याची माहिती हळदे कुटुंबियांनी दिली.



# सुरेश बनकर यांची घरवापसी ! प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवेच्या उपस्थितीत भाजपमध्ये दाखल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** विधानसभा निवडणुकीपुरते शिवसेनेच्या ठाकरे गटात गेलेले सुरेश बनकर पुन्हा भाजपमध्ये परतले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते, भाजप नेते रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपमध्ये घरवापसी केली आहे. अब्दुल सत्तार यांना पराभूत करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी सर्वपक्षीयांना एकत्र येण्याचे आव्हान केले होते. त्यानुसार भाजपला सोडचिठ्ठी देत त्यांनी 'मशाल' हाती घेतली होती. मात्र सुरेश बनकर यांना विजयाचा गुलाल उधळता आला नाही. त्यानंतर अडीच महिन्याच्या काळातच सुरेश बनकर यांनी भाजपचा झेंडा पुन्हा हाती धरला आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्यासह पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री अतुल सावे, अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सुरेश बनकर यांना पक्षप्रवेश देत बावनकुळे यांनी शुभेच्छा दिल्या. लवकरच बनकर यांच्यावर पक्षाची मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याचे पक्ष सूत्रांनी सांगितले.



जालन्याचे भाजप नेते रावसाहेब दानवे आणि सिल्लोड चे आमदार अब्दुल सत्तार यांच्यातील राजकीय वैर सर्वश्रुत आहे. लोकसभा निवडणुकीत दानवेच्या पराभवात सत्तारांचा हात होता. ही बाब लपून राहिलेली नाही. त्यानंतर रावसाहेब दानवे यांनी विधानसभा निवडणुकीत सत्ताराविरुद्ध फील्डिंग लावली होती. एवढेच नव्हे तर सुरेश बनकर यांना ठाकरे गटात प्रवेश देऊन उमेदवारीही त्यांनी मिळून दिली होती. मात्र अब्दुल सत्तार यांच्या विरोधात बनकर यांचा अवघ्या २ हजार ४२० मतांनी निसटता पराभव झाला होता. सुरेश बनकर ठाकरे गटाचे उमेदवार होते परंतु त्यांच्यासाठी भाजपची अवघी स्थानिक यंत्रणा कार्यरत होती असे चित्र निवडणुकीत दिसले होते. त्यामुळे सत्तारांनीही रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव यांच्याविरुद्ध कन्नड मध्ये कार्यकर्त्यांना कामाला लावले होते. मात्र संजना जाधव शिंदे गटाच्या उमेदवार असल्याकारणाने सत्तारांचे प्रयत्न फारसे फळाला आले नाहीत. संजना जाधव यांचा मोठा विजय झाला. तिकडे अब्दुल सत्तार यांचा पराभव होता होता वाचला.

सुरेश बनकर पराभूत झाल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या मूळ पक्षात येण्याची तयारी केली होती. गेल्या काही दिवसात तसे चित्रही निर्माण झाले होते. शरीराने ठाकरे गटात आणि मनाने भाजपमध्ये अशी अवस्था बनकर यांची झालेली होती. त्यांच्या संपर्क कार्यालयात भाजप पदाधिकाऱ्यांचे वाढदिवस साजरे करण्यात येत होते. महापुरुषांची जयंती साजरी करतानाही तिथे स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती दिसत होती. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुती विरोधात विधानसभा निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांना पक्षप्रवेश देणार नसल्याचे म्हटले होते. त्यामुळे त्यांचा प्रवेश होणार की नाही, याची शंका होती. पण रावसाहेब दानवे यांनी पुढाकार घेऊन बनकर यांचा पक्षप्रवेश घडवून आणलाच.

**"भाजपात दाखल झाल्यानंतर बनकर यांनी अब्दुल सत्तार यांच्यावर पुन्हा टीकास्त्र सोडले ""**

आमचा अब्दुल सत्तार यांना विरोध होता. त्यामुळे मी भाजप सोडून ठाकरे गटात गेलो होतो. सत्तार यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली. आता पुन्हा भाजपात आलो आहे. मात्र अब्दुल सत्तार यांना विरोध कायम राहील. अब्दुल सत्तार हे हिंदू विरोधी आहेत. असा आरोप सुरेश बनकर यांनी केला. सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदार संघातील १३५५४० जनतेचा मी कायम ऋणी राहील. त्यांच्यासाठी मी सदैव तत्पर राहील. भविष्यात सर्वसामान्यांच्या अडीअडचणी, सुखदुःखात मी सदैव सक्रिय राहील असे यावेळी त्यांनी सांगितले. वरिष्ठ नेत्यांच्या सांगण्यावरूनच आपण पुन्हा भाजपात आल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

==========

# रिक्षा चालकच ठरला रिक्षा चोर; पनवेल शहर पोलीसांनी सराईत ऑटो रिक्षा चोरास अटक करून १८ ऑटो रिक्षा जप्त केल्या

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर**:पनवेल शहर पोलिसांनी सराईत ऑटो रिक्षा चोरणाऱ्या आरोपीला अटक करून १२ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या १८ रिक्षा बुलढाणा येथून जप्त करण्यात यश आले आहे. मुख्य मंझे हा रिक्षा चालवत असतानाच चोरीच्या रिक्षा हेरून तो त्या चोरी करत होता. पनवेल शहर परिसरातील व आजुबाजुच्या पोलीस ठाणे परिसरात दिवसेंदिवस रिक्षा चोरीच्या गुन्हयांच्या वाढत्या घटनांच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकामार्फत तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज तपास, गुप्त बातमीदार व इतर प्रकारे शोध चालू असताना पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोहवा नितीन वाघमारे, पोहवा महेंद्र वायकर व पोशि चंद्रशेखर चौधरी हे पोलीस ठाणे हददीमध्ये गस्त करत असताना गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्या आरोपीशी साम्य असलेला संशयीत इसम दिसला. त्याला स्थानिक नागरीकांचे मदतीने ४ किलोमीटर पाठलाग करून ताब्यात घेवून विचारपूस केली. यावेळी त्याने त्याचे नाव निसार सत्तार खान, (वय -३६ वर्ष, रा. कच्छी मोहल्ला, पनवेल) असल्याचे सांगितले. सदर इसमाकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील ऑटो रिक्षा चोरी केल्याचे कबुल केले. नमुद आरोपीकडे कौशल्यपुर्ण अधिक तपास केला असता आरोपीने सदर गुन्हयातील तसेच पनवेल शहर, कळंबोली, कामोठे पोलीस ठाण्याच्या परीसरातुन देखील सुमारे १ वर्षापासून १८ ऑटो रिक्षा चोरी केल्याचे कबुल करून सदर ऑटो रिक्षा या त्याने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुका येथे विक्री केल्याचे सांगितल्याने. या आरोपीला अटक करून त्याने दिलेल्या माहीतीची शहानिशा करण्याकरीता बुलढाणा पोलीस पथक रवाना करण्यात आले होते. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा येथे जावुन स्थानिक पोलीसांचे मदतीने विविध गुन्हयातील तब्बत १८ ऑटो रिक्षा ताब्यात घेवून त्याचा अभिलेख तपासला असता मिळालेल्या रिक्षापैकी १० ऑटो रिक्षा या पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील गुन्हयातील, ४ ऑटो रिक्षा कळंबोली पोलीस ठाण्याकडील दाखल गुन्हयातील आणि ३ ऑटो रिक्षा या कामोठे पोलीस ठाणे कडील दाखल गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. एका ऑटो रिक्षावरील इंजिन नंबर व चेसिस नंबर खोडण्यात आल्याने या रिक्षाबाबत अद्यापपर्यंत उपयुक्त माहिती प्राप्त झालेली नाही. अश्या प्रकारे कौशल्यपूर्ण तपस करून नवी मुंबई आयुक्तालयातील सुमारे १२ लाख ४५ हजार रूपये किंमीसमा १८ रिक्षा जप्त करण्यात आल्या असून १७ ऑटो रिक्षा चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यास पनवेल पोलीसांना यश मिळाले आहे. सदर कामगिरी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकिर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजीत अभंग, पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हे पकटीकरण पथकातील सपोनि प्रकाश पवार, पोउपनि विनोद लभडे, पोलीस हवालदार यशवंत झांझम, अविनाश गंथडे, नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, अमोल डोईफोडे, महेंद्र वायकर, महेश पाटील, अमोल पाटील, संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, किरण सोनावणे, लक्ष्मण कटक (मेहकर पोलीस ठाणे), पोलीस नाईक विनोद देशमुख, मिथुन भोसले, पोलीस शिपाई किरण कराड, चंद्रशेखर चौधरी, विशाल दुधे यांनी केली आहे.



## बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी मुंबई यांच्या सौजन्याने आयोजित बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी चषक २०२५ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (केतन भोज)**:बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी मुंबई यांच्या सौजन्याने आयोजित बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी चषक २०२५ युट्यूब लाईव्ह ओव्हरआर्म क्रिकेट सामने दि.०२ फेब्रुवारी रोजी मूर्धा मास्टर यंगस्टार ग्राउंड भाईंदर पश्चिम येथे आयोजित करण्यात आले

### समाजसेवक राजेंद्र सखाराम भुवड यांची कार्यक्रमाला भेट

होते.या सदर कार्यक्रमाचा शुभारंभ गणेश पूजन कृष्णा मांडवकर यांच्या हस्ते (अध्यक्ष- बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी ,स्थानिक) करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेले पुष्पहार सुनिल खळे यांच्या हस्ते अर्पण करून(मा. अध्यक्ष-बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी,स्थानिक )झाले.कार्यक्रमाचा शुभारंभाची फितप्रशांत शिंदे (भाजप जिल्हा सरचिटणीस श्रीवर्धन) यांच्या हस्ते कापून झाली. श्रीफळ वाढवने-निलेश शंकर बोर्ले(अध्यक्ष- बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी ,मुंबई ) यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाला बागमांडला हरेश्वर विभाग कुणबी समाज कमिटी,मुंबईविनायक किजबिले (उपाध्यक्ष),विजय पेंढारी (उपाध्यक्ष),सचिन निवाते(सचिव),सुनिल पवार (सहसचिव),दीपक जाधव(सहसचिव),सुनिल जाधव(खजिनदार),गणेश भोजने(सहखजिनदार) ,चेतन किजबिले(हिशोब तपासनीस) आणि सदस्य शिवाजी खळे,विनोद भुवड,गजानन निंबरे,श्रीकांत निवाते,संजय चाचले,प्रितम किजबिले,आदेश रामाणे,श्याम खाडे,शैलेश शिगवण,सुशिल टाकले,संदीप खोपटकर,रविंद्र पवार,भरत टाकले,संजय टाकले,प्रशांत टाकले,निलेश जाधव,संदेश जाधव,नितिन टाकले,सुधीर पेंढारी,जगन्नाथ पेंढारी,रुपेश भुवड,सिद्धेश खोपटकर,प्रेमनाथ जाधव, चंद्रकांत कासरुंग,संजय भोसलेकर,आदि मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते. या अटितटीचया सामन्यात अतिउल्लेखनीय कामगिरी करून संघाने प्रथम क्रमांक - जय भवानी क्रिकेट संघ धारवली तसेच द्वितीय क्रमांक- बाबदेव क्रिकेट संघ मारळ,तृतीय क्रमांक- अष्टविनायक क्रिकेट संघ सायगाव व चतुर्थ क्रमांक-जे.के.के. सी.जसवली आणि उत्कृष्ट गोलंदाज- शेखर (धारवली संघ)उत्कृष्ट फलंदाज- समीर (मारळ संघ)मालिकावीर चषक - नैनेश (धारवली संघ)यांची निवड करण्यात आली.



यावेळी या कार्यक्रमाला समाजसेवक राजेंद्र सखाराम भुवड यांनी भेट दिली.यावेळी मंडळाचे अध्यक्ष निलेशजी बोर्ले आणि पदाधिकारी यांच्या वतीने सह्याद्री कुणबी संघ पुणे शहर प्रमुख महाराष्ट्र,रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुख,पत्रकार,समाजसेवक राजेंद्र सखाराम भुवड यांचा सन्मान करण्यात आला.

===================

## कामगार विभागातील दलालांचे समूळ उच्चाटन करा - संभाजी माळवदे

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी:-**

**लखन वाल्हेकर**-अहिल्यानगर जिल्ह्यातील कामगार विभागातील दलालांचे समूळ उच्चाटन करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश कामगार विभागाचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगर येथील सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे केली.शासनाने कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरु केल्या असून या योजनाच्या माध्यमातून कामगारांना विविध प्रकारचे लाभ देण्यात येतात. परंतु या योजनाचा लाभ मिळविण्याकरिता दलालाशिवाय पर्यायचं उरला नसल्याचे आढळून आले आहे. कामगारांच्या नोंदणीपासून ते विविध योजनाचा लाभ मिळेपर्यंत या दलालाच्या मध्यस्थीशिवाय पर्यायच उरला नाही.अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील कामगाराना विविध प्रकारचे आमिष दाखवून या कामगारांची दलालाकडून मोठी लूट होत आहे. बांधकाम कामगार मंडळात नोंदणी केल्यानंतर विवाहासाठी, महिलांना प्रसूतीसाठी, मुलांच्या शिक्षणसाठी, पदवी व पदवीत्तर शिक्षण घेण्यासाठी, गंभीर आजाराच्या उपचारार्थ, नैसर्गिक मृत्यू झाल्यास, विधवा पत्नीस मानधन असे लाभ कामगारांना मिळतात. याशिवाय मध्यान्न भोजन, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती योजना, सुरक्षा विमा योजना, अशा योजनाचा लाभ कामगार मंडळाच्या माध्यमातून देण्यात येतो. याशिवाय कामगारांना कामाच्या व सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपयोगी वस्तूंची किट दिली जाते.अशा योजना



### सहाय्यक कामगार आयक्तांना निवेदणाद्धारे मागणी

सरकारकडून राबविल्या जातात परंतु या योजनाची माहिती व प्रक्रिया कामगारांना माहिती नसल्याने दलाल याच गोष्टीचा फायदा घेतात जिल्ह्यात कामगारांना मिळणाऱ्या पेट्या मिळवून देण्यासाठी देखील अमाप पैसा या दलालानी लुटला. यात कर्मचारी, अधिकारी, यांचा देखील समावेश आहे. कामगारांना मिळणाऱ्या लाभातील अर्धाभाग हा दलाल लुटतात. जिल्ह्यातील अनेक दलालांनी अल्पवधीतच करोडो रुपयांची माया कमावली यात मोठया इमारती, चारचाकी वाहन, जमिनी, प्लॉट,असा ऐवज जमावला आहे. तर अनेक दलाल आमचा अधिकारी वर्गाशी कसा संबंध आहे हे पटवून आमच्या शिवाय तुमचे कामच होऊ शकत नाही, तुम्हाला योजनेचा लाभ मिळूच शकत नाही असे सांगून लूट करतात. तर फक्त नोंदणी साठी दोन ते तीन हजार रुपये व शिवाय पावत्याच्या नूतनीकरण करण्यासाठी दरवर्षी तेवढेच पैसे हे दलाल उकळतात. या सर्वांना आळा घालण्यात यावा व या दलालांच्या मुसक्या आवळल्या जाव्यात यासाठी आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कामगार विभागाचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगर येथे सहाय्यक कामगार आयुक्त यांची भेट घेऊन या दलालावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. व अहिल्यानगर जिल्ह्यातील कामगार विभागातील दलालाचे समूळ उच्चाटन करण्याची मागणी केली.यावेळी नेवासा काँग्रेसचे अंजुम पटेल, बसपाचे हरीश चक्रनारायण, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब काळे, गुलाब शेख, आदी उपस्थित होते.

## अवैध सिलेंडरचा साठा करून घरगुती व व्यवसायिक विक्री करणाऱ्या त्रिकुटाला तळोजा पोलसांनी केले गजाआड



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)**:तळोजा परिसरात अवैध सिलेंडरचा साठा करून घरगुती व व्यवसायिक विक्री करणाऱ्या त्रिकुटाला तळोजा पोलसांनी केले गजाआड करून मोठ्या प्रमाणात साठा हस्तगत केला आहे.तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील पाले खुर्द येथील इसम विकास नारायण दुर्गे ( वय 50 वर्षे) हा त्याचे स्वतःचे मालकी जागेत अवैध सिलेंडरचा साठा करून घरगुती व व्यवसायिक विक्री करत असल्याची माहीत तळोजा पोलीस ठाण्याचे वपोनि प्रवीण भगत यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने छापा टाकला असता सदर ठिकाणी १४०७ सिलेंडर मिळून आले असून त्यापैकी ४३८ भरलेले सिलेंडर व ९६९ रिकामे सिलेंडर मिळून आले आहेत. सदर इसमाकडे सिलेंडर गॅस विक्रीचे व साठवणूक करण्याचे कोणतेही कागदपत्रे नाहीत. सदर ठिकाणी विकास दुर्गे याचेसह बबलू पवार, (51 वर्षे वाहन चालक) व लखन जाधव (23 वर्षे हे काम पाहत होते. सदर इसम हा विष्णू भारत गॅस, पनवेल येथून दररोज 80 सिलेंडर 14 किलोग्रॅम वजनाचे 803 रुपये प्रति सिलेंडर दराने व वरद विनायक एचपी गॅस, कळंबोली येथून 1 दिवसाआड 48 सिलेंडर 14 किलोग्रॅम वजनाचे 825 रुपये प्रति सिलेंडर दराने ब्लॅकने खरेदी करत आहे. तसेच दर 3 दिवसाने 234 सिलेंडर 19 किलोग्रॅम वजनाचे सिलेंडर बीपीसीएल उरण येथून फ्रेंडस भारत गॅस, घणसोली यांचे नावाने खरेदी करायचा. हे सिलेंडर वाहतूक करण्याकरिता विकास दुर्गे याच्याकडे आयशर टेम्पो, महिंद्रा पिकप तसेच टाटा छोटा हत्ती अशी तीन वाहने आहेत. या घटनास्थळावरून गॅस सिलेंडर रिफिलिंग करण्याचे सामग्री देखील मिळून आली आहे. सदर इसम हा चिंध्रन, पालेखुर्द, वावंजे, कुत्तरपाडा, देवीचापाडा, पाटीलवाडी येथील हॉटेल, दुकानदार, काही घरगुती यांना सिलेंडर विक्री करत असल्याची माहीत मिळाली आहे. या त्रिकुटाच्याटकेमुळे अवैध धंद्यांना आळा बसणार असल्याची माहिती वपोनि प्रवीण भगत यांनी दिली.

=====================

## उरण मधील धक्कादायक वृत्त :बिनधास्तपणे दिवसाढवळ्या गोवंशीय मांस विक्री

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी**:रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात वाढत्या औद्योगीकरणामुळे उरण मधील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परराज्यातील व परप्रांतीय वस्ती वाढत आहे.त्यामुळे गुन्हेगारीचा आलेख हि उरणमधील वाढत आहे.उरण म्हणजे गुन्हेगारीचे आश्रयस्थान आहे. बांगलादेशीय नागरिक उरणमध्ये सापडत आहेत दोन दिवसापुर्वी बांग्लादेशी नागरिक सापडले आणि आता याच नागरिकांमधून गोमासाची मागणी वाढत आहे. खुलेआम गोवंशिय माऱ्सांची विक्री होत आहे .रात्री अपरात्री तस्करी गेली ४० वर्षे उरण मधून होत आहे . असा दावा वानरसेना संस्थेचे संस्थापक सिद्धेश शिंदे यांनी केला आहे. आणि या गुन्हेगारांचा पर्दाफाश सिद्धेश शिंदे यांनी केला आहे उरणमधील रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर समीर ब्रदर्स पेट्रोल पंपापुढील मार्गावर सापळा रचून सिद्धेश शिंदे व त्यांचे सहकारी यांनी गोमांस घेऊन जाणारी रिक्षा अडवून चौकशी केली असता म्हशीचे मांस आहे असे सांगून उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली. त्याचप्रमाणे हे जनावरांचे मांस विक्री करणारी एक महिला आहे हि धक्कादायक बाब समोर आली. दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी अकरा वाजताची हि घटना आहे. या घटनेने परिसरात नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.



गोरक्षक सिध्दार्थ शिंदे यांनी या घटनेची माहिती उरण पोलिसांना देताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पोलिसांनी चौकशी केली असता विनापरवाना गेल्या ४० वर्षापासून हे गैरकृत्य होत आहे असे उघड झाले आहे . कलम बी. एन. एस. एस. १७३ च्या अंतर्गत, रायगड नवी मुंबई एफ आर .आय .नंबर ००२८, भारतीय न्याय संहिता बी. एन. एस २०२३चे कलम ३२५ भारतीय न्यायसंहिता बी. एन. एस .२०२३ चे कलम ३(५)', महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ ५ सी, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ ९,मोटार वाहन अधिनियम १९८८ ६६( १) या नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या सदरच्या घटनेमधील गुन्हेगारांचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी महत्वाचे योगदान दिले आहे ते वानरसेना ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष सिध्देश शिंदे तसेच बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद सदस्य व उरण पोलीस यंत्रणा होय.महत्त्वाचे म्हणजे या प्रकरणाची पुढील चौकशी डॉ उदय ओथरे आणि पी एस आय सुरज कांबळे यांनी या मांसाचे शॅम्पल कलीना येथे शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहे. नेमके हे मांस कोणत्या प्राण्यांचे आहे गोवंशीय मांस आहे की म्हैशीचे आहे. हे आता पुढील तपासणी अंती निष्पन्न होईल.

===================